# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 26/12/2022 (सोमवार) सकाळ

## घरफोडी

**१) पो.स्टे. कन्हान** :– अंतर्गत ०१ कि.मी. अंतरावरील वार्ड नं. ५ गजानन मंदीर जवळ कांद्री कन्हान येथे दिनांक २१/१२/२०२२ ते दिनांक २२/१२/२०२२ चे १३.०० वा. ते ०७.५० वा. दरम्यान फिर्यादी नामे– सौ. कविता राकेश शुक्ला, वय ५५ वर्ष, रा. २२० वार्ड नं. ०५ गजानन मंदीर जवळ कांद्री कन्हान हि आपल्या मुलीकडे दिल्ली येथे गेली असता तिच्या घरासमोर राहणारे वर्मा यांनी फिर्यादीला फोन करुन सांगीतले की, ''तुम्हारे घर का लॉक तुटा हुआ है'' असे फिर्यादीस माहीती होताच फिर्यादीचा कन्हान मध्ये राहणारा दिर नामे– धर्मराज शुक्ला यास फोनव्दारे माहीती देवुन सांगीतले तेव्हा फिर्यादीच्या दिराने फिर्यादीला सांगीतले की, फिर्यादीच्या घराचे कुलुप कोंडा तोडून घराचे लाकडी कपाटाचे लॉक तोडुन दिसले असता त्याने सांगीतले की घरात चोरी झाली आहे असे माहीती होताच फिर्यादी ही दिल्ली वरुन परत आली व तिने घरी जावुन चेक केले असता तिच्या घरातील सोन्याचे दागिने १) सोन्याची अंगुठी ५.६९ ग्रॅम २) पिट्टु सोन्याचे मणी ०.५ ग्रॅम, ३) जेन्टस सोन्याची अंगुठी ४.८१ ग्रॅम ४) सोन्याची नथनी १.६६ ग्रॅम, ५) चांदीचे कंगण किंमती अंदाजे ३०००/– रु. ६) नगदी ३०००/–रु., ७) एक जेन्टस सोन्याची चैन १० ग्रॅम , ८) १ सोन्याचा गोफ, ९) १ सोन्याचा गोफ १० ग्रॅम , १०) १ सोन्याचा गोफ १० ग्रॅम, ११) २ सोन्याचे मंगळसुत्र १२) ३ जेन्टस सोन्याची अंगुठी १५ ग्रॅम १३) १ लेडीज सोन्याची अंगुठी ४.८१ ग्रॅम १४) सोन्याचे कानातले २.५० ग्रॅम असा एकुण ८९.९७ ग्रॅम सोने १० ग्रॅम २५०००/– रु. प्रमाणे तसेच चांदीचे दागीने किंमती अंदाजे २,२५,०००/– रुपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम ४५४, ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सफौ/४६० पाल मो. नं. ९५५२५१७२६८ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. रामटेक** :– अंतर्गत महेश नगर छोरिया ले आऊट रामटेक येथे दिनांक २५/१२/२०२२ चे ०८.०० वा. ते १७.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे– सुनिल मोतीराम पानतावने, वय ४० वर्ष, रा. महेश नगर छोरिया ले आऊट रामटेक हे घराला कुलुप लावुन टाकळघाट येथे दर्शनासाठी गेले असता दर्शन करून परत आले कोणीतरी अज्ञात चोराने घराचे कडी कोंडी तोंडुन आत प्रवेश करून लाकडी आलमारी मधुन सोन्याचे दागिने १) शॉट गाठी सोन्याची १२ ग्रॅम किंमती अंदाजे ३०,०००/– रू.२) चैन लॉकेट सोन्याचे ०८ ग्रॅम किंमती अंदाजे २०,०००/–रू. ३) रींग अंगठी सोन्याची ०५ ग्रॅम किंमती अंदाजे ५०००/–रू. ४) अडिच ग्रॅम रिंग अंगठी किंमती अंदाजे ३०००/–रू. ५) सुईदोरा कानातले अडीच ग्रॅम किंमती अंदाजे ४७९२/–रू. असा एकुण किंमती अंदाजे ६२७९२/–रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम ४५४, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पालीस नायक श्री योगेश भुरे, ब. नं. ६७३ मो.क्र. ७७२२००३६७३ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**